MHAU070009222025

<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक १६/२०२५</u>
<u>निशाणी क्रमांक २८ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज दि. २८.११.२०२४ रोजीचा पारित केलेला 'लेखी जबाब नाही' आदेश बाजुस सारुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जातील कथने खालील प्रमाणे आहेत.</u>**

**०२.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या लेखी जबाबासाठी होते. मात्र, प्रस्तुतचे पक्ररण हे मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर वैजापुर येथुन स्थलांतरीत होऊन ते मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापुर येथे स्थलांतरीत झाल्यानंतर प्रकरणात प्रतिवादी यांना पुन्हा सदर प्रकरणाची नोटीस प्राप्त न झाल्याने प्रतिवादी यांचा प्रकरणाबाबत माहिती मिळु न शकल्याने तसेच प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द शिल्लेगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाल्यामुळे ते वकीलांना भेटु शकले नाही व प्रकरणाबददलची माहिती घेऊ शकले नाही. त्यामुळे प्रतिवादींना प्रकरणात लेखी म्हणणे दाखल करण्यास एक वर्ष व १० दिवसाचा विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण हे कराराची पुर्तता करुन मिळणे बाबत व मनाई हुकूम मिळण्याकामी असल्याने सदर आदेश बाजुस सारुन न घेतल्यास प्रतिवादींचे म्हणणे पटलावर न आल्याने त्यांचे नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचा लेखी जबाब</u>**

**३.** अर्जदाराने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, केवळ प्रकरण विलंबावर टाकण्याकरीता प्रस्तुचा अर्ज दाखल केला आहे. अर्जात

नमुद केलेले कारण योग्य नाही. सबब अर्ज फेटाळण्याची विनंती अर्जदाराने केली आहे.

४. <u>दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.</u>

५. प्रकरणांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द दि. २८.११.२०२४ रोजी विना लेखी जबाब आदेश परित केलेला आहे. त्यानंतर दि. २४.०९.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज म्हणजेच सुमारे एक वर्ष १० दिवसांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. मात्र सदरचे प्रकरण हे कराराची पुर्तता करुन मिळणे बाबत व मनाई हुकूम मिळण्याकामी असल्याने व त्यात प्रतिवादींचे लेखी म्हणणे पटलावर येणे आवश्यक असल्याने, त्यांच्या विरुध्दचा, विना लेखी जबाब आदेश, बाजुस सारणे आवश्यक आहे. विलंबाकरीता व प्रकरण अंतिम युक्तीवादावर असताना प्रस्तुत अर्ज दाखल केल्याने प्रतिवादीस खालीलप्रमाणे जादा कॉस्ट करणे उचित होईल. उपरोक्त कारण मिमांसेवरुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रुपये २५००/– कॉस्ट वर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द दि. २८.११.२०२४ रोजीचा विना लेखी जबाब आदेश बाजुस सारण्यात येतो.

३. सदर कॉस्ट प्रतिवादीने वादी यांना प्रदान करावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.10.15 12:34:47 +0000

**दिनांक : १४.०९.२०२५.**

**(रोहीत नं. पाठक )**
**सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),**
**गंगापुर.**

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba AgeStenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 14/10/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 14/10/2025 |
| Judgment uploaded on | : 15/10/2025 |